# पुस्तकासारखा चांगला मित्र नाही

## उपसभापती विष्णू वाघ यांचे प्रतिपादन



पणजी : गोवा लायब्ररी असोसिएशनच्या मार्गदर्शकीचे प्रकाशन करताना उपसभापती विष्णू वाघ समवेत इतर मान्यवर.

**प्रतिनिधी**
पणजी

पुस्तकासारखा दुसरा चांगला मित्र नाही, गुरु नाही. वेळेस मित्र मैत्री तोडू शकतो, गुरु विद्या लपवू शकतो, पण पुस्तक नाही. प्राचीन, आधुनिक अशा विचारांचे संचित जाणून घेण्यासाठी पुस्तक हे महत्त्वाचे माध्यम आहे, असे प्रतिपादन उपसभापती विष्णू सूर्या वाघ यांनी केले.

'गोवा लायब्ररी असोसिएशन" या नवीन संघटनेच्या उद्घाटनसमयी ते बोलत होते. आपण किती वाचतो यापेक्षा काय वाचतो आणि कसे वाचतो यावर आपली आकलनशक्ती वाढत जाते, स्मरणशक्ती वाढते. स्वत:बद्दल, त्याच्या वाचन लेखन या पार्श्वभूमीचा आढावा घेत वाघ यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वाचनासाठी आवाहन केले. उपसभापतींच्या हस्ते गोवा लायब्ररी असोसिएशनच्या मार्गदर्शकीचे प्रकाशन करण्यात आले.

साळगावकर कॉलेजचे प्रिन्सिपल प्रसाद यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. तत्पूर्वी संस्थापक अध्यक्ष निर्मला परब यांनी प्रास्ताविक केले. खजिनदार बाळा मांद्रेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन करूणा सातार्डेकर यांनी केले तर सचिव मानसी देलीम यांनी आभार मानले.

# स्वामी विवेकानंद सोसायटीतर्फे उद्या गुरुपौर्णिमा

**पणजी :** स्वामी विवेकानंद सोसायटी पणजी येथे मंगळवार १९ रोजी गुरूपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळपासून पूजा व तसेच सायं ४. वा. गुरुपुजन व संस्थेच्या मान्यवराकडून समई प्रज्वलित करून उद्घाटन होईल. त्यानंतर दिलीप गडेकर, तुळशिदास नावेलकर व माधुरी सावंत या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली गायन वादनाचा कार्यक्रम होईल.

तरुण भारत सोमवार, १८ जुलै २०१६